नि.फौ.ख.क्र.२४९/२०२१
शासन–वि– माया मानेकर
नि.क्र. २४

<u>मी शपथेवर खरे सांगतो की,</u>

माझे नांव – मनोज गुलाबराव नांदुरकर
वय अंदाजे ५९ वर्ष, कामधंदा– सेवानिवृत्त,पोलीस उपनिरीक्षक
राहणार– आलोडी, तह. व जि. वर्धा.

.......................................................................................................................

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ ची सरतपासणी– सरकारी वकील श्री.एस.एम.दुंगे यांच्या मार्फत.</u>**

१. दि.१६.०२.२०२१ रोजी मी पोलीस स्टेशन देवळी येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. मला अपराध क्रमांक १६०/२०२१ ची केस डायरी मला तपासकामी प्राप्त झाली होती. त्यासोबत एफआयआर व तोंडी रिपोर्ट प्राप्त झाला होता. केसडायरी मिळाल्यावर मी पोलीस स्टॉफसह घटनास्थ्ळावर गेलो, फिर्यादीची भेट घेतली व फिर्यादीने दाखविल्याप्रमाणे घटनास्थ्ळाचा पंचनामा केला. त्यानंतर मी पंचाना सुचनापत्र दिले. आता मला सूचनापत्र P1/PW4 दाखविण्यात आले. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ हे फिर्यादीने बटईने घेतलेल्या शेतामध्ये काजळसरा शिवारातील मौजा वाटखेडा येथील होते. शेत हे मोहन व प्रणित हसनापुरे यांचे मालकीचे होते. घटनास्थळावर जळालेल्या लाकडांची राख आढळून आली होती. पंचनामा मी सायंकाळी ५ ते ५.३० या वेळेत केला. आता मला घटनास्थळ पंचनामा P २/PW4 दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर फिर्यादी व साक्षीदारांचे बयाण त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदविले. नंतर कागदपत्रे सात बारा उतारे तलाठी कार्यालय व ईसेवा केंद्रातून प्राप्त केले. आता मला दाखविण्यात आलेले सात बारे उतारे तेच असून त्यावर संबधीत कायार्यालयाचा शिक्का आहे. त्यास नि.क्र. P1/PW ५, P २/PW ५ देण्यात येते. आरोपी ही तिच्या आईच्या नावे बयाबाई जवादे असलेले शेत वाहत होती. घटनास्थळ व आरोपीच्या आईचे शेत हे लगतच्या धु–याला लागून आहे.

२.     आरोपीला पोलीस ठाण्यात बोलावून चौकशी करण्यात आली होती. आरोपीला सुचनापत्र देवून सोडले. आता मला सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी, आरोपीची सही आहे. त्यास नि.क्र. P ३/PW ५ देण्यात येते. सुचनापत्र दिल्याची नोंद स्टेशन डायरीवर घेण्यात आली होती. त्याचा उतारा दाखल केला आहे. आता मला स्टेशन डायरीचा उतारा दाखविण्यात आला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र. P २/PW ६ देण्यात येते. ज्या वस्तुच्या सहायाने म्हणजेच माचिसने इंधन पेटविले ती वस्तू इंधनामध्येच टाकून दिली असे आरोपीने सांगीतले. मी आरोपीस बघीतल्यास मी ओळखू शकतो. आरोपीचा गैरहजेरीचा अर्ज दाखल आहे. आरोपीविरुध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपपत्र नयायालयात दाखल केले. आरोपीने जाळलेले इंधन अंदाजे १५,०००/– रुपयाचे होते.

**<u>उलट तपास आरोपीतर्फे – श्री.बी.आर.चौधरी विधीज्ञ यांचे मार्फत</u>**

३.     हे म्हणणे खरे आहे की काजळसरा व वाटखेडा हे दोन भिन्न गाव आहे व त्या दोन्ही गावांची वस्ती अंदाजे ५००० अशी आहे. हे म्हणणे खरे आहे की वाटखेडा व काजळसरा म्हणून एकच तलाठी आहे. हे म्हणणे खरे आहे की मी तलाठी यांना अहवाल पाठविला नाही व घटनेबाबत त्यांचे जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी ही विवाहीत असून तिला मुलंबाळ आहे. हे मला माहिती नाही की ती तिच्या आईपासून विभक्त राहते. हे म्हणणे खरे आहे की आरोपीची हिच्या नावाने मौजा काजळसरा व वाटखेडा या दोन्ही ठिकाणी शेतजमिन नाही. बयाबाईचे शेत आरोपीच वाहत होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपी व बयाबाई यांचे पटत नव्हते त्यामूळे ती घटनेच्या वेळी बयाबाईचे शेत वाहत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की बयाबाई व मोहन हुसनापूर यांचेमध्ये वाद झाला होता. हे म्हणणे खरे नाही की बरेचसे शेतकरी त्यांचे शेतातील कचरा हा धु–यावर टाकून पेटवून देतात. हे म्हणणे खरे नाही की आरोपी सदर शेताची मालक नसल्यामूळे ती त्या ठिकाणी गेली नाही व तिने असे ज्वलनशील काम केले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी मोहन हुसनापुरे यांचे सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

<u>उलट तपास पुर्ण</u>

<u>फेरतपास नाही.</u>

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृती | माझे समक्ष |
| MRUNAL YASHWANT DOIPHODE<br>Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE<br>Date: 2026.07.18 16:08:08 +0530 | MRUNAL YASHWANT DOIPHODE<br>Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE<br>Date: 2026.07.18 16:08:13 +0530 |
| (श्रीमती एम.वाय.डोईफोडे) | (श्रीमती एम.वाय.डोईफोडे) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, | मुख्य न्यायदंडाधिकारी, |
| वर्धा, दिनांक १८.०७.२०२६ | वर्धा, दिनांक १८.०७.२०२६. |